# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## ग्रामगीता संदेश यात्रा (१४ सप्टेंबर, २०१९)

दिनांक १४ सप्टेंबर, २०१९ रोजी महाविद्यालयाच्या वतीने 'ग्रामगीता संदेश यात्रे'चे आयोजन करण्यात आले होते. ही संदेश यात्रा 'ग्रामगीतेतून ग्रामविकासाकडे' हा संदेश देण्यासाठी बोरी अरब परिसरातील १८ गावांची परिक्रमा करून समाप्त झाली. यामध्ये बोरी अरब, जवळगाव, पिंप्री, विरगव्हाण, मालखेड (बु.), एलगुंडा, मालखेड(खु.) सारंगपूर, ब्रम्ही, लाडखेड, तपोना, मोरगव्हान, पांढूर्णा, बोधगव्हाण, उजोना, दुधगांव, सावळी व बोरी(बु.) अशा १८ गावांचा समावेश होता.

या संदेश यात्रेमध्ये सामाजिक बांधिलकी जपणारे तरूण विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच महाविद्यालयात कार्यरत विविध विभाग सहभागी झाले होते. ग्रामगीते' मध्ये ४० अध्यायांचे ८ पंचक आहेत परंतु 'ग्रामगीता' ज्या महान ग्रंथामुळे प्रेरित होऊन लिहिली आहे त्या 'भगवत् गीते' मध्ये १८ अध्याय आहेत. म्हणून प्रातिनिधिक स्वरूपात १८ गावांमध्ये ही यात्रा 'ग्रामगीतेतून ग्रामविकासा'चा संदेश देत आली.

हा संदेश ग्रामगीतेतील विविध वचने, फलक, घोषणा व मार्गदर्शनपर व्याख्यान अशा स्वरूपात देण्यात आला. गावातील नागरिकांनी आपापल्या गावांमध्ये या संदेश यात्रेचे उत्साहाने स्वागत केले. ग्रामगीतेचे पारायण व्हावे या उद्देशाने महाविद्यालयाच्या वतीने एक 'ग्रामगीता' सन्मानपूर्वक गावातील प्रतिष्ठित नागरिकास भेट म्हणून देण्यात आली.

बोरी अरब पासून सुरुवात झालेल्या या संदेश यात्रेची सांगता संध्याकाळी ५.०० वाजता बोरी (बु.) येथे करण्यात आली. यावेळी गावातील प्रथम नागरिक सरपंच श्री. मुकेश कळंबे यांना महाविद्यालयाचे व्यवस्थापक मा. श्री. जगन्नाथराव बोरकर व प्राचार्य, डॉ. केशवराव फाले यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची 'ग्रामगीता' भेट म्हणून देण्यात आली. यावेळी प्राचार्यांनी ग्रामगीतेचे आजच्या घडीला असलेले महत्त्व समस्त गावकऱ्यांना आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. या संदेश यात्रेकरिता प्रत्येक गावातील गावकऱ्यांचा मिळालेला प्रतिसाद व विद्यार्थ्यांचा उत्साह हा महत्त्वाचा होता.




